# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. माअधि/अपिल/०८/२०१८
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.
दि.०८/०२/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री.श्रवणकुमार मिश्रा, ....... **अपिलार्थी**
ए/८ कस्तूरी इन्डस्टीयल
इस्टेट, गोडदेव फाटक रोड,
भाइदर (पुर्व), जि.ठाणे.४००१०५.

**विरुध्द**

जनमाहिती अधिकारी तथा ....... **प्रतिवादी**
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

## -: विवेचन :-

श्री.श्रवणकुमार मिश्रा, भाईदर (पुर्व) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.२२/११/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मनपा मे कार्यरत सुरक्षा कर्मियो से ज्यादा सुरक्षा कर्मी दिखाकर फर्जी हजेरी का मस्टर रोल रजीस्टर सहारे प्रो.सैनिक सिक्यूरीटी का मालिक हायग्री व एच. गुरू उर्फ नाना ने मनपा का करोडो राजस्व का गबन किया इसकी शिकायत ०७-१०-२०१७ तथा १६-१०-२०१७ को दिया था कार्यवाही से संबधित सभी अभिलेखित कागजपत्रोका निरीक्षण करा कर आवश्यक माहिती की सत्यप्रत दे.

२) सैनिक सिक्युरिटी व उसकी सह फर्मो से संबधित अब तक कितनी शिकायते प्राप्त हुई जिस पर दिये जबाब सभी आवक जावक पत्रो की झेराक्स सत्यप्रत दे.

**अपिल दाखल करण्याची कारणेः-**

मागितलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याने अपीलार्थी यांनी दि.१५/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु सदर अपिल हे दि.२२/०१/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

**सुनावणीचा तपशिलः-**

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०८/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ/आस्था/२०७/२०१७-१८ दि.०३/०२/२००१८ अन्वये कळविण्यात आले. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) <u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवादः</u>- माझ्या दि.२२/११/२०१७ रोजीच्या अर्जाप्रमाणे आस्थापना विभागाकडून चुकीची माहिती देण्यात आली असुन मुद्यानुसार माहिती देण्यात आली नाही.

२) <u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवादः</u>- अपिलार्थी अर्जदार यांना अभिलेखाचा शोध घेऊन माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्दा क्र.१ ची सुधारित माहिती विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतिः-**

१) श्री.श्रवणकुमार मिश्रा,
ए/८ कस्तूरी इन्डस्टीयल
इस्टेट, गोडदेव फाटक रोड,
भाईंदर (पुर्व), जि.ठाणे.४००१०५.

14-02-2018

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

9/2/2018

३) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय